# बच्चे रंगणार 'माय फ्रेंड गणेशा'मध्ये

## आसमंत-आर्ट सर्कल : विद्यार्थ्यांनी प्रोत्साहन मिळण्यासाठी स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

रत्नागिरी : आसमंत बेनवोलन्स फाऊंडेशन पुरस्कृत व नंदकुमार पटवर्धन यांच्या संकल्पनेतून साकारलेली माय फ्रेंड गणेशा पर्यावरण स्नेही गणपती (इको फ्रेंडली गणेशमूर्ती) बनवण्याची स्पर्धा २६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. सकाळी स्पर्धा व दुपारी लगेच बक्षीस वितरण होणार आहे.

मुलांसाठी घेतली जाणारी ही स्पर्धा वेगळेपणा जपणारी आहे. या स्पर्धेत पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी असे गट आहेत. तिसरा गट हा गेल्या स्पर्धांतील विजेत्यांचा गट आहे. शहर परिसरातील शाळांतील विद्यार्थी दररोज सराव करत आहेत. आसमंत फाऊंडेशनतर्फे स्पर्धेसाठी पुठ्ठा व शाडूची माती दिली जाणार असून, विद्यार्थ्यांनी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत मूर्ती तयार करावयाची आहे. त्यानंतर स्पर्धेचे परीक्षण करून क्रमांक काढले जाणार आहेत.

रत्नागिरीत या स्पर्धेला मिळत असलेला प्रतिसाद लक्षात घेऊन आसमंत बेनवोलन्स फाऊंडेशनतर्फे मित्रमेळाच्या माध्यमातून राजापूरमध्येही स्पर्धा घेतली जात आहे. ही स्पर्धा २ सप्टेंबरला राजापूरमध्ये आयोजित केली आहे. आसमंत फाऊंडेशन विद्यार्थी, पर्यावरणासाठी विविध उपक्रम वर्षभर राबवते.

विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या निमित्ताने साकारलेल्या गणेशाची प्रतिष्ठापना विद्यार्थ्यांनी घरी करावी. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळण्याकरिता या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे आसमंत फाऊंडेशनचे प्रमुख नंदकुमार पटवर्धन यांनी सांगितले.

---

२५/८ तरुण भारत

# रविवारी रत्नागिरीत माय फ्रेंड गणेशा मूर्ती स्पर्धा

**रत्नागिरी :** आसमंत बेनवोलन्स फाउंडेशन पुरस्कृत व नंदकुमार पटवर्धन यांच्या संकल्पनेतून साकारलेली माय फ्रेंड गणेशा पर्यावरणस्नेही गणपती (इकोफ्रेंडली गणेशमूर्ती) बनवण्याची स्पर्धा आर्ट सर्कलतर्फे आयोजित केली आहे. रविवारी २६ रोजी पटवर्धन हायस्कूल, रत्नागिरी येथे सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत कार्यक्रम होईल. या स्पर्धेत पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी असे गट आहेत. आसमंत फाउंडेशनतर्फे स्पर्धेसाठी पुठ्ठा व शाडूची माती दिली जाते. विद्यार्थ्यांनी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत मूर्ती बनवायची आहे. त्यानंतर स्पर्धेचे क्रमांक काढले जाणार आहेत.